**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 13.11.2024** **वार – बुधवार**

---

**रक्तदान शिबिरं**

दिवाळी सुटी आणि विधानसभा निवडणुकीमुळं रक्तदान शिबिरं कमी झाल्यानं पुणे शहरात रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. ससून सर्वोपचार रुग्णालयातील रक्तपेढीत केवळ पाच दिवसांचा साठा शिल्लक आहे. दिवाळी सुटीमुळं रक्ताची मागणीही कमी होती. ती आता वाढू लागल्याने साठा कमी पडत आहे. नियमित रक्तदात्यांना आवाहन करून सध्याची गरज पूर्ण केली जात आहे. आगामी काळात रक्तदान शिबिरांचं आयोजन करण्यात आलं असल्याचं रक्तपेढीचे प्रमुख डॉक्टर मंगेश सागळे यांनी सांगितलं.

**डेंग्यू**

पुणे  शहरातील डेंग्यू आणि चिकुनगुन्याची रुग्णसंख्या कमी होत आहे. या महिन्यात डेंग्यूचे 58 संशयित रुग्ण आढळले असून, चिकुनगुन्याचा एकही रुग्ण आढळलेला नाही. शहरात डेंग्यूचे या वर्षभरात 4422 रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी 357 रुग्णांचं निदान झालं आहे अशी माहिती महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉक्टर राजेश दिघे यांनी दिली.

**मतदार-जागरुकता**

‘मतदान करण्यास जाऊया, आपल्या देशाचा विकास करूया’ अशी घोषवाक्यं, त्याला अनुरूप रांगोळी रेखाटत तसंच ढोल ताशांच्या गजरात बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सांगवीतील मतदारांना मतदानाचं महत्त्व पटवून दिलं.  चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप टीमच्या वतीनं आज हा कार्यक्रम राबविण्यात आला.

**दिव्यांग**

चिंचवड मूक बधिर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका उमा तारु यांनी  दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांना विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन आज एका मेळाव्यात केलं.

**हेमंत रासने**

जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत व्यापाऱ्यांशी संबंधित जीएसटीच्या सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी पाठपुरावा करू असं आश्वासन कसबा विधानसभा मतदारसंघाचे  महायुतीचे उमेदवार हेमंत रासने यांनी आज दिलं. मुख्य बाजारपेठांमधील व्यापाऱ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते.

**समुत्कर्ष सोशल फाउंडेशन**

महायुती सरकार दिव्यांगांच्या पाठिशी खंबीर उभं असून; शासनाने दिव्यांगांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, याचा पुनरुच्चार भाजपा उमेदवार चंद्रकांत पाटील यांनी आज पुण्यात केला. समुत्कर्ष सोशल फाउंडेशनद्वारे आयोजित दिव्यांगाच्या मेळाव्यात ते बोलत होते.

**प्रचार फेरी**

आंबील ओढा परिसरासह, पर्वती विधानसभा मतदारसंघातील नाल्यांच्या बाजूला असलेल्या रहिवासी वस्तीतील पूरस्थिती रोखण्यासाठी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करून 200 कोटी रुपयांचा निधी आणला आहे. तसंच, केंद्र शासनाने शहरात पावसाळयात उद्भवणारी स्थिती लक्षात घेऊन शहरी पूर व्यवस्थापनासाठी महापालिकेला 350 कोटींचा निधी दिला जाणार असल्याची माहिती महायुतीच्या पर्वती विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवार माधुरी मिसाळ यांनी दिली. मिसाळ यांनी बिववेवाडी परिसरात आज प्रचारफेरी दरम्यान नागरिकांशी संवाद साधला.

**काँग्रेस**

एका राज्यातील प्रकल्प दुसऱ्या राज्यात पळवले जात असतील तर याला आक्षेप राहील असं मत छत्तीसगडचे माजी उप मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते  टी.एस. सिंगदेव यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत व्यक्त केलं. महायुतीच्या काळात महाराष्ट्राची आर्थिक पिछेहाट झाल्याची टीकाही त्यांनी केली.

**पुस्तक**

पुणे पुस्तक महोत्सव यावर्षी 14 ते 22 डिसेंबर या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालायाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे अशी माहिती संयोजक राजेश पांडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे आणि संचालक युवराज मलिक यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली.  या महोत्सवासाठी आत्ताच 700 दालनांची नोंदणी झाली आहे. वाचन संस्काराला बळ मिळेल असे विविध कार्यक्रम होणार असून देशभरातील विविध भाषांमधील साहित्यिकांची उपस्थिती हे या महोत्सवाचे आकर्षण आहे असं युवराज मलिक यावेळी म्हणाले.

**नेमबाजी**

पुण्यातल्या म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात सुरु झालेल्या पाचव्या राष्ट्रीय पॅरा नेमबाजी स्पर्धेत आज दुपारच्या सत्रात 10 मीटर एअर रायफल एच एस 1 महिला गटाचे अंतिम सामने झाले. यामध्ये राजस्थानच्या मोना अग्रवालनं सुवर्ण पदक पटकावलं तर अवनी लेकरा हिला रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं. 10 मीटर एअर रायफल एच एस 2 मिश्र गटात उत्तर प्रदेशच्या खुशबू हिनं सुवर्ण तर हरियाणाच्या सिमरन शर्मा हिनं रौप्य आणि तेलंगणच्या सत्या जे आर यानं कास्यपदक पटकावलं.

**दंत**

इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेन्टिस्ट्रीतर्फे 22 ते 24 नोव्हेंबर 2024 या कालावधीत 'प्रगत दंतोपचार व दंतरोपण' यावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन पुण्यात केलं आहे अशी माहिती इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेन्टिस्ट्रीचे अध्यक्ष डॉक्टर रत्नदीप जाधव यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. देशविदेशातून 800 हून अधिक दंतवैद्यक यात सहभागी होणार आहेत. तीनही दिवस चर्चासत्रांसह प्रात्यक्षिक कार्यशाळा होणार आहेत. तसंच अत्याधुनिक उपकरणांचं प्रदर्शन असणार आहे.

पुणे आणि परिसरात उद्या कमाल तापमान तीस अंशांच्या खाली राहणार असून आकाश दुपारनंतर ढगाळ राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**